# बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे जुलै – २०१८

## गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ९, गुअवि; मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | गुप्रशा; गुरक्र. ९२/२०१५ कलम ४८९(ब)(क),१२०(ब),३४ भादवि सह कलम १५ a (iii a) सह १६,१८ बेकायदेशिर कृत्य(प्रतिबंधक) अधि. १९६७ सुधारीत २०१३. (बांद्रा पोलीस ठाणे गु.र.क्र. ५९५/२०१५) |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २१/०९/२०१५ रोजी १३.०० वा. ते १४.३० वा. चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | बालाजी रेस्टॉरंट समोर, श्री.बाबा नगर, सेंटर पिटर रोड, बांद्रा (प.), मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | पो.ना.क्र.३३०४६/प्रकाश तुकाराम वारंगे नेमणुक– कक्ष ९, गुप्रशा; गुअवि; मुंबई |
| ५ | **हस्तगत मालमत्ता** | रू.१०००/– च्या १०१ नोटा व रू.५००/– च्या १९८ बनावट भारतीय चलनी नोटा ( एकूण मूल्य २,००,०००/– ) |
| ६ | **आरोपी अटक** | १) शाजहान मिया मुर्तुझा वय २६ वर्षे व<br>२) खबीरुल रेझीब शेख वय १९ वर्षे<br>**अटक दिनांक २१/०९/२०१५ रोजी १४.३० वा.** |

गुप्रशा; गुरक्र. ९२/२०१५ कलम ४८९(ब)(क),१२०(ब),३४ भादवि सह कलम १५ a (iii a) सह १६,१८ बेकायदेशिर कृत्य(प्रतिबंधक) अधि. १९६७ सुधारीत २०१३. (बांद्रा पोलीस ठाणे गु.र.क्र. ५९५/२०१५) या गुन्हयात दिनांक २१/०९/२०१५ रोजी १३.०० वा. ते १४.३० वा. चे दरम्यान बालाजी रेस्टॉरंट समोर, श्री. बाबा नगर, सेंटर पिटर रोड, बांद्रा (प.), मुंबई याठिकाणी अटक आरोपी क्र. १) शाजहान मिया मुर्तुझा वय २६ वर्षे व २) खबीरुल रेझीब षेख, वय १९ वर्षे यांनी उच्च प्रतीच्या बनावट भारतीय चलनी नोटा भारतीय बाजारपेठेत वितरीत करुन भारतीय अर्थव्यवस्थेस क्षती पोहचविण्याचा पुर्वनियोजित दहशतवादी स्वरुपाचा कट रचला व सदर कट तडीस नेण्याच्या अनुषंगाने संगनमताने रू.१०००/– च्या १०१ नोटा व रू.५००/– च्या १९८ बनावट भारतीय चलनी नोटा ( एकूण मूल्य २,००,०००/– ) हया बनावट आहेत हे माहिती असुनही त्या चलनात आणावयाच्या इरादयाने स्वताच्या कब्जात बाळगल्या, तसेच रु. १,०००/– दराची बनावट भारतीय चलनी नोट मोबाईल चार्जर खरेदी करण्याच्या बहाण्याने भारतीय बाजारपेठेत चलनात वापरुन दहशतवादी कृत्य केले म्हणुन गुन्हे प्रकटीकरण शाखा,कक्ष ९, गुअवि; मुंबई येथे नमणुकीस असलेले पो.ना.क्र.३३०४६/प्रकाश तुकाराम वारंगे यांनी दिनांक २१/०९/२०१५ रोजी सरकारतर्फे फिर्याद दिलेवरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्हे प्रकटीकरण शाखा,कक्ष ९, गुअवि; मुंबई च्या पथकाने मानवी कौशल्य वापरून उच्च प्रतीच्या बनावट भारतीय चलनी नोटा भारतीय बाजारपेठेत वितरीत करुन भारतीय अर्थव्यवस्थेस क्षती पोहचविणारे आरोपी क्र. १) शाजहान मिया मुर्तुझा वय २६ वर्षे व २) खबीरुल रेझीब षेख, वय १९ वर्षे यांना दिनांक २१/०९/२०१५ रोजी १४.३० वा.रोजी कौशल्याने अटक केले. अटक आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास करुन आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक ०४/०१/२०१६ रोजी मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, ३७ वे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई येथे कोर्ट केस क्र.७६/पीडब्ल्यू/२०१६ अन्वये दोषारोप पत्र सादर केले तसेच सदर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळवुन मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे दि.२६/०७/२०१५ रोजी सेशन केस क्र.११९/२०१६ अन्वये सदरचा गुन्हा वर्ग करण्यात आला.

सदर पथकाने मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच करंन्सी नोट प्रेस, नाशिक रोड, भारत सरकार यांचा बनावट नोटांचा अहवाल विहित वेळेत सादर केला. तसेच सदर पथकाने ०१ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/१० पंच व इतर पुरक साक्षीदार सादर करून दिनांक ०७/०७/२०१८ रोजी मा. सत्र

न्यायालय, मुंबई यांनी आरोपी क्र. १) शाजहान मिया मुर्तुझा वय २६ वर्षे व २) खबीरुल रेझीब षेख, वय १९ वर्षे यांना दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :—

**मा. न्यायालयाने यातील अटक आरोपी क्र.१) शाजहान मिया मुर्तुझा यास दिलेली शिक्षा :—**

**अ)** भादवि. कलम ४८९(ब) प्रमाणे **०५ वर्षे सश्रम कारावास** व रु.१०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**ब)** भादवि. कलम ४८९(क) प्रमाणे **०४ वर्षे सश्रम कारावास** व रु.१०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

**मा. न्यायालयाने यातील अटक आरोपी क्र.२) खबीरुल रेझीब शेख यास दिलेली शिक्षा :—**

**अ)** भादवि. कलम ४८९(ब) प्रमाणे **०५ वर्षे सश्रम कारावास** व रु.१०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास,

**ब)** भादवि. कलम ४८९(क) प्रमाणे **०४ वर्षे सश्रम कारावास** व रु.१०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास,

वरिल सर्व शिक्षा दोषसिध्द आरोपीतांनी एकत्र भोगायच्या आहेत.

गुन्हे प्रकटीकरण शाखा,कक्ष ९, गुअवि; मुंबई च्या पथकाने मानवी कौशल्याचा वापर करून उच्च प्रतीच्या बनावट भारतीय चलनी नोटा भारतीय बाजारपेठेत वितरीत करुन भारतीय अर्थव्यवस्थेस क्षती पोहचविण्याचा पुर्वनियोजित दहशतवादी स्वरुपाचा कट रचून सदर कट तडीस नेण्याच्या अनुषंगाने संगनमताने बनावट भारतीय चलनी नोटा बाळगुन तसेच रु.१,०००/— दराची बनावट भारतीय चलनी नोट मोबाईल चार्जर खरेदी करण्याच्या बहाण्याने भारतीय बाजारपेठेत चलनात वापरुन दहशतवादी कृत्य करणाऱ्या दोन आरोपीतांना बनावट नोटांसह अटक करून त्यांचेविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र दाखल केले व मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपींना शिक्षा झालेली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे जुलै — २०१८ चे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष ९, गुअवि; मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार :—**

| अक्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव | अक्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस आयुक्त सुनिल बाबर | ५ | पोहलेक्रं.२८४४८/आनंद नारायण सोनावणे |
| २ | वपोनि. महेश पांडुरंग देसाई | ६ | पोनाक्रं.३२६८०/फकीरा मोहम्मद अब्दुल रहमान शेख |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय ज्ञानदेव दिघे | ७ | पोनाक्रं.३३०४६/प्रकाश तुकाराम वारंगे |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद चांगदेव धराडे | ८ | पोशिक्रं.०३.१२२३/प्रविण कृष्णा कांबळे |

—— ००० ——